# प्रेस नोट

## राष्ट्रीय खाद्यतेल अभियान- तेलबिया (NMEO-OS) अंतर्गत उन्हाळी हंगाम २०२४-२५ अंतर्गत महाडीबीटी पोर्टल वर अर्ज सादर करणेसाठी मुदतवाढ

---

राष्ट्रीय खाद्यतेल अभियान- तेलबिया (NMEO-OS) मध्ये **उन्हाळी हंगाम २०२४-२५ अंतर्गत उन्हाळी भुईमुग व तीळ पिकांचे समुहांतर्गत १०० % अनुदानावर प्रमाणित बियाणे वितरण, शेतकरी प्रशिक्षण व शेतीशाळा या बाबी राबविण्यात येणार आहेत.**

सदर बाबींसाठी लाभार्थ्यांची निवड महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्जाद्वारे करण्यात येणार आहे. सदर योजनेंतर्गत भुईमुग पिकासाठी कोल्हापूर/ सातारा/ सांगली / पुणे/ अहिल्यानगर/ नाशिक / धुळे /छत्रपती संभाजी नगर या ८ जिल्ह्यांतील शेतक-यांना व तीळ पिकासाठी जळगाव/ लातूर/ बीड/ बुलडाणा या जिल्ह्यांतील शेतक-यांना लाभ द्यावयाचा आहे. यासाठी महाडीबीटी च्या https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/ या पोर्टलवर बियाणे, औषधे, खते या tile अंतर्गत बियाणे घटकामध्ये भुईमुग किंवा तीळ पिकांसाठी प्रमाणित बियाणे वितरण या घटकासाठी अर्ज करणेसाठी दि.७ फेब्रुवारी, २०२५ पासून दि.१० फेब्रुवारी, २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती.

योजनेंतर्गत अधिकाधिक शेतक-यांचा सहभाग वाढविणेसाठी सदर मुदत **दि.१३ फेब्रुवारी, २०२५** पर्यंत वाढविण्यात आली आहे. तरी जास्तीत जास्त शेतक-यांनी योजनेंतर्गत लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी विभागीय कृषी सह संचालक / जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी / उप विभागीय कृषी अधिकारी / तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

********************************

जा.क्र.कृ.आ.वि.प्र.२/महाडीबीटी/२०२४-२५/र-३८/२०२४
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००५
दिनांक : १० फेब्रुवारी, २०२५

**प्रति,**

**कृषि उपसंचालक,माहिती विभाग**
**कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**
यांना माहिती तथा पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

--//स्वाक्षरीत//--
**( र.शा.नाईकवाडी )**
**संचालक (विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.**